


# बीडिंग फुट

ह्या शिकवणीत तुम्ही उषा जानोम बीडिंग फुटच्या साह्याने बीड स्ट्रिंग्सने सजवणे शिकाल.




किती वेळा तुम्ही वस्त्रांना आणि सह-साधनांना बीड्सने सजवलेले पाहिले आहे आणि तसेच वस्त्र बनवण्यासाठी उत्सुक झाला आहात, परंतु एकावेळी फक्त एक बीड जोडण्याची मेहनत न करता? तुमचे उत्तर इथे आहे.
ह्या शिकवणीमध्ये, तुम्ही नेमके तेच करायला शिकणार आहात – उषा जानोम बीडिंग फुट चा वापर करून बीड्सच्या दोऱ्यांनी सजावट करणे.

उषा जानोम बीडिंग फुट तुमची मदत करेल सर्व प्रकारच्या बीड्स जसे – लाकडी, काचेच्या, मोती, शिवण्यासाठी जोवर बीड चा आकार 2.5 मिमी आणि 4.0 मिमी दरम्यान आहे. उत्सुक आहात जाणून घेण्यासाठी की हे इतके सोपे कसे आहे.... चला तर मग सुरु करूया.

ह्या पाठाकरिता तुम्हाला आवश्यक असणारे साहित्य आहेत उषा जानोम बीडिंग फूट, बीडिंग चा अभ्यास करण्यासाठी कपड्याचा एक तुकडा, बीड असलेली लेस, दोरी (बीड्स चा व्यास 2.5 मिमी ते 4 मिमी), पारदर्शी धागा आणि एक कात्री.

बीड लेस कापडावर अंथरा आणि मोजण्यासाठी कापा. दोन जोड असलेल्या बीडिंग फुट चा वापर करा.

तुमच्या साध्या प्रेसर फुटच्या जागी बीडिंग फुट तडकून बसवा.









बीडिंग फुटच्या खोबणीखाली बीड्सची रांग अशाप्रकारे ठेवा.

बीडिंग फुटच्या खोबणीखाली बीड्सची रांग अशाप्रकारे ठेवा. झिगझॅग स्टीचची निवड करा, स्टीचची रुंदी 4 आणि स्टीचची लांबी 2.5 ठेवा.

स्टार्ट बटण दाबा, वेग कमी ठेवा आणि बीड्सच्या सरळ रेषेत शिवणे सुरु करा. तुम्ही बघाल की कशाप्रकारे सुई नागमोडी पद्धतीने बीड्सना कपड्यावर शिवत आहे.
शेवट झाल्यावर धागा कापा आणि तुमच्या पहिल्यावहिल्या बीड्स लावलेल्या नमुन्याचे सर्वेक्षण करा – आनंद झाला ना ! मला खात्री आहे की तुम्ही तुमचे ते सगळे प्रकल्प हाती घेण्यास उत्सुक आहात ज्यांत तुम्हाला बीड्स लावायचे होते. बीड्सपासून बनवलेला हा नेकपीस बघा – विलक्षण आहे ना !

तुम्ही धाग्याऐवजी अतिरिक्त डिझाईन म्हणून दोरीचासुद्धा वापर करू शकता. एकदा तुम्ही विविध प्रकारच्या बीड्स आणि दोऱ्यांच्या बाजाराची पडताळणी केल्यावर तुम्हाला लक्षात येईल की तुम्ही ह्या फुटच्या मदतीने काय काय करू शकता. ह्या फुटचा वापर तुम्ही कपड्यांवर किंवा तुमच्या आवडीच्या इतर कुठल्याही साहित्यावर बीड्स तसेच दोऱ्या शिवण्यासाठी करू शकता कारण ह्याचा वापर कागद, प्लास्टिक आणि अगदी तागावरही करता येतो.